माहिती व तंत्रज्ञान विभाग
दि. ०७.०५.२०१६

**परिपत्रक**

**विषय** - ई-फाईल नोंद संगणक प्रणालीबाबत . . . .
File Tracking System

२/- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये नस्ती/पत्र पाठविणेकरीता व पाठविलेल्या नस्ती/पत्राची स्थिती कळणेकरीता माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत ई-फाईल नोंद (DMFT) संगणक प्रणाली विकसित करणेत येऊन NMMP प्रकल्पांतर्गत कार्यान्वित करणेत आलेली आहे. त्याचा वापर विविध विभागांमार्फत कार्यान्वित असून त्याबाबतचे प्रशिक्षण देखील संबंधितांना देणेत आलेले आहे.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, विविध विभागांचे विभागप्रमुख / शाखाप्रमुख मा. आयुक्त यांचे कार्यालयाकडे ई-फाईल नोंद पध्दतीद्वारे नस्ती सादर न करता समक्ष मा. आयुक्त कार्यालयात सादर केल्या जातात. सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख/ शाखाप्रमुखांना कळविणेत येते की, सदरचे परिपत्रक प्राप्त होताच सर्व प्रकारच्या नस्ती ई-फाईल नोंद संगणक प्रणालीद्वारे नोंद करूनच पाठविल्या जातील याची दक्षता घेणेत यावी. ज्या विभागप्रमुख/ शाखाप्रमुखांनी दि. ०२.०५.२०१६ पासून File Tracking System द्वारे नोंद न करता सादर केलेल्या व स्वाक्षरी झालेल्या नस्तींची यादी तात्काळ आयुक्त कार्यालयास सादर करावी.

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

**प्रत** – सर्व विभागप्रमुख/ शाखाप्रमुख

क्रमांक – मातं/६/कावि/ ९३२ /२०१६
दिनांक - ११/०५/२०१६